# <u>पुणे मेट्रो व पीएमपीएमएल द्वारे फीडर बस सेवेचा प्रारंभ</u>

पीएमपीएमएल आणि पुणे मेट्रो यांनी पुणेकर नागरिकांसाठी फीडर बस सेवा उपलब्द करण्यासाठी महत्वाचे पाऊल टाकले आहे. प्रवासी सेवेला प्राधान्यक्रम देण्यासाठी मेट्रो स्थानक परिसरात फीडर बस सेवा सुरु करण्याचे ठरविले आहे व त्याचा शुभारंभ करण्यात आला

प्रवासी आता पुणे मेट्रो फीडर बस सेवेने मेट्रो रेल्वे स्थानकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि मेट्रो स्थानकांच्या आजूबाजूच्या ठिकाणांवर जाऊ शकतात. या मेट्रो फीडर बस सेवेचा शुभारंभ २१ मार्च २०२२ रोजी गरवारे कॉलेज मेट्रो स्थानक येथून दुपारी १२.०० वाजता संपन्न झाला. मेट्रो फीडर बस सेवांचा पहिला टप्पा खालील मेट्रो स्थानकांवरून देखील उपलब्ध असेल. या फीडर बस सेवेचे भाडे ५ रु. ते १० रु. असणार आहे.

**Metro Feeder Bus Services (PMPML)- Operations - Information**

| Line | Metro Stations | Feeder Route Length - Circular (KM) | Travel Time (Min.) | Nos. Bus Stops on the Routes | Circulat Routes & Bus Stops |
|---|---|---|---|---|---|
| Purple Line | PCMC | 8 | 30 | 21 | PMCM Metro Station / Ambedkar Chowkh / Gandhi Nagar / Raw Plauss Co. / HA Corner / Masulkar Corner / Greenfield-Masulkar Colony / Manish Garden Swapnanagari / Anna Saheb Magar Stadium / Yeshwant Nagar / TELCO Co. / KSB Chowkh / Sanghavi College / Sanghavi College-2 / Finolex Corner / Kishore Pump / Pimpri Court Corner / Samrat Chowkh / MHADA Madhuban Society / PCMC Metro Station. |
| | Sant Tukaram Nagar | 7.6 | 30 | 21 | Sant Tukaram Nagar Metro Station / Vallabh Nagar ST Stand / Amar Smurti Society / Shantai Nivas / Hutatma Chowkh / DY Patil Law College / Phule Nagar / MIDC Chowkh / Bharat Gas MIDC / Pawna Industrial Estate / Tothread Gauges / Pimpri Depot / Jyoti English School / Vittal Nagar / Yuvraj Park / Udhyam Nagar / Zero Boys / Nehru Nagar Corner / Mahesh Nagar Chowkh / DY Patil Pimpri / HA Petrol Pump Corner / Sant Tukaram Nagar Metro |
| | Bhosari | 8.2 | 30 | 20 | Bhosari Metro Station / Nasik Phata / MIDC Police Chowki / MIDC Corner / Phillips Chowkh / Electronic Bhavan / Dues Port / Surubhi Industries / T-Block / Avhi Chemical / K-Ward / Jyoti English School / Ganesh Mandir / Nehru Nagar Corner / Mahesh Nagar / YCM Hospital / Sant Tukaram Nagar / Vallabh Nagar / Vallabh Nagar Corner / Bhosari Metro Station. |
| | Phugewadi | 8.1 | 30 | 19 | Phugewadi Metro Station / Atlas Copco / Kasarwadi Metro station / Marshall Co. Gate / Kasarwadi / Kshtriya Karyalay / Datta Mandir / Shruti Chowkh / Prabhat Nagar Lane-1 / Harmony Complex / Surya Nagri Society / Pimple Gurav Municipal Corporation School / Katepuram Chowkh / Swapna Park / Ram Krushna Mangal Karyalay / Vijay Nagar / HP Petrol Pump / CNG Pump – Dapodi Metro Station / Phugewadi Metro Station. |
| Aqua Line | Garware College | 5 | 25 | 13 | Garware College Metro Station / Sanjeevni Hospital / Khilarewadi / Shardha Center / Mahadev Mandir / Dattawadi / Mhasova Chowkh / Global Hospital / Rajendra Nagar / Lokhmanya Nagar / Sambhaji Maharaj School / Ganjve Chowkh / Deccan Chowkh / Garware College Station |
| | Nall Stop | 5.5 | 25 | 15 | Nall Stop Metro Station / Desehpandepuram Society / Satish Chatre Sabha Gruha / Narayani Clinic / Alankar Police Chowki / Shailesh Sabha Gruha / Samarth Chowkh / Vittal Mandir / Patel Aamachi / Joshi Upahar Gruha / Saket Society / Siddhi Garden / Mahadev Mandir / Padale Palace / Nall Stop Chowkh / Nall Stop Metro Station |

मेट्रो फीडर बस (मेट्रो शटल) सेवा २१ मार्च २०२२ पासून पिंपरी चिंचवड मनपा, संत तुकाराम नगर, भोसरी, फुगेवाडी, गरवारे कॉलेज, नल स्टॉप या सहा मेट्रो स्थानकांवरून वर्तुळाकार मार्गाने काम करतील, सुरुवातीला मेट्रो शटल बस सेवा यांचे वेळापत्रक मेट्रो रेल सेवा वेळापत्रकही समन्वय साधून बनविण्यात आले आहे. प्रवाश्यांचा प्रतिसाद आणि मागणी बघून सेवांच्या वेळापत्रकात भविष्यात बदल करण्यात येणार आहे. मेट्रो रेल्वे सेवांच्या वारंवारतेशी जुळण्यासाठी बससेवाची वारंवारिता वाढवली जाईल.

सेवेसाठी ओळखले गेलेले मार्ग, रस्त्यांची रुंदी, दाट लोकवस्तीच्या निवासी आणि व्यावसायिक भागात धावणाऱ्या मार्गावरील बस थांबे यांच्या व्यवहार्यतेवर पूर्णपणे काम केले गेले आहे. मार्गांचे वर्तुळाकार अंतर सुमारे ५-८ किमी आहे आणि प्रवाशांच्या मागणीनुसार ते ९-१० किमीपर्यंत वाढवले जाईल. मागणी वाढल्याने मेट्रो फीडर बसेसची संख्याही वाढवली जाईल. वेगवेगळ्या मार्गांवर सुमारे१३-२१ बस थांबे (पिक-अप/ड्रॉप-ऑफ पॉइंट्स) आहेत, जे शहराच्या अंतर्गत निवासी भागात राहणाऱ्या अधिक नागरिकांना त्यांच्या निवासस्थानातून आणि कामाच्या ठिकाणांहून मेट्रो फीडर बस सेवेचा लाभ घेण्यासाठी अधिक सक्षम करतात आणि त्यांना दैनंदिन मेट्रो रेल्वे सेवेचा लाभ देऊ शकतात. मेट्रो शटल बस सेवेचे भाडे ५ रु. ते १० रु. इत्यादी ठरविण्यात आले आहे.

या बस सेवा मेट्रो रेल्वेच्या वेळापत्रकाशी समन्वयीत केल्या जातील. ज्यामुळे नागरिक मेट्रो सेवा वापरण्यास सक्षम असतील. संबंधित मेट्रो स्थानकांसाठी या मेट्रो फीडर बस सेवांच्या उपलब्धतेवर आम्ही ऑन-बोर्ड ट्रेन घोषणा आणि मेट्रो स्टेशनवर देखील याची खात्री करू. या मेट्रो फीडर बस सेवांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि मेट्रो सेवांसाठी तसेच फीडर बस सेवांसाठीही अधिक प्रवासी संख्या वाढवण्यासाठी आम्ही संबंधित मेट्रो स्टेशनवर आवश्यक सूचना दिल्या जाणार आहेत.

अखंड आणि कार्यक्षम प्रवासी माहिती आणि मोबाईल ऍप्लिकेशन्सद्वारे एकात्मिक तिकीटासाठी विचारविनिमय सुरु आहे. मेट्रो व पीएमपीएमएल यांचे मोबाईल अँप मध्ये समन्वय देखील साधला जाणार आहे. आम्ही 'एक पुणे' मेट्रो स्मार्ट कार्डद्वारे एकात्मिक तिकीट करण्याचाही प्रयत्न करीत आहोत. जे फीडर बस सेवांवर तसेच सर्व शहर बस सेवांवर भविष्यात 'एक शहर एक कार्ड' उपक्रम राबविण्यासाठी वापरण्यात येईल. आम्ही पीएमपीएमएलसोबत एकत्रितपणे काम करत आहोत ज्यामुळे नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवा, पुणे मेट्रो रेल्वे सेवा आणि पीएमपीएमएल सिटी बस सर्व्हिसेस या दोन्हींवर संबंधित स्मार्ट कार्डचा वापर अखंड आणि कार्यक्षम पद्धतीने एकात्मिक तिकिटासाठी करता येईल.

आज एकूण सहा मार्गांवर "मेट्रो शटल" सेवेचा प्रारंभ झाला. भविष्यात आजून नवीन मार्गांवर "मेट्रो शटल" सेवा पुरविण्यात येणार आहे. पुणे मेट्रो व पीएमपीएमएल यांचे मल्टी मोडल इंटिग्रेशन सिव्हिल कोर्ट, शिवाजीनगर, नळ स्टॉप, स्वारगेट स्थानक येथे करण्यात येत आहे. जेणेकरून मेट्रो प्रवाश्याना विनासायस बस सेवेचा लाभ घेता येईल. तसेच बस प्रवाश्यांना सहजपणे मेट्रो स्थानकांपर्यंत पोहचता येईल.

पुणे मेट्रोने आत्तापर्यंत २४ फीडर सेवा पुरविणाऱ्या संस्थांशी करार केला आहे. यापैकी काही संस्थांनी सेवा पुरविण्यात सुरुवात केली आहे. महामेट्रो नवीन फीडर सेवा पुरविणाऱ्या संस्थांशी करार करण्यास उत्सुक आहे.

| Feeder Service Partners | | |
|---|---|---|
| **S.No.** | **Type of Feeder Vehicle** | **No. Service Providers** |
| 1 | e-Bicycle | 2 |
| 2 | Bicycle (Pedal) | 1 |
| 3 | e-Bikes | 11 |
| 4 | e-Autorickshaw | 3 |
| 5 | Autorickshaw | 2 |
| 6 | Cab | 3 |
| 7 | Mini Buses | 2 |
| **8** | **Total** | **24** |

आज दिनांक ३ मार्च २०२२ रोजी गरवारे स्थानक येथून सहा मेट्रो स्थानकांपासून फीडर बस सेवेचा प्रारंभ करण्यात आला. या प्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दिक्षित व पीएमपीएमएल चे व्यवस्थापकीय संचालक श्री. लक्ष्मीनारायण मिश्रा उपस्थित होते. श्री. अतुल गाडगीळ, मेट्रो संचालक, श्री. विनोद अग्रवाल, मेट्रो संचालक, व श्रीमती चेतना केरुरे, अति. व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल व मेट्रो आणि पीएमपीएमएलचे अधिकारी उपस्थित होते